**MHKO120000742022**

नियमित दिवाणी दावा क्र.१८/२०२२
(CNR No.MHKO120000742022)

## निशाणी क्र.७७ खाली आदेश

वादी यांनी सदर अर्ज निशाणी क्र.५ चे तुर्तातुर्त मनाई अर्जावरील प्रतिवादी यांचेविरुध्दचा तुर्तातुर्त मनाईचा हुकुम पुढील तारखेपर्यंत वाढविणेकरीता दाखल केला आहे.

०२. वादीच्या कथनानुसार, प्रस्तुतचा दावा वादी यांनी प्रतिवादी विरुध्द कायम मनाईसाठी दाखल केला आहे. निशाणी क्र.५ चे तुर्तातुर्त मनाई अर्जावर प्रतिवादी यांनी निशाणी क्र.५ चे अर्जावर म्हणणे देईपर्यंत प्रतिवादी यांचे विरुध्द तुर्तातुर्त मनाईचा आदेश केलेला आहे. सदर कामी प्रतिवादी यांनी निशाणी क्र.५ चे अर्जास म्हणणे दाखल केलेले आहे. सदर कामी तुर्तातुर्त मनाईचा आदेश आज अखेर अस्तित्वात आहे. त्या कारणाने तुर्तातुर्त मनाई हुकुम पुढील तारखेपर्यंत वाढविणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक व अगत्याचे आहे. सदर हुकुम पुढील तारखेपर्यंत न वाढविलेस प्रतिवादी हे दांडगाव्याने दावा मिळकतीचा कब्जा काढुन घेतील व दावा मिळकतीमधील ऊस पिकाचे नुकसान करतील व तसे झाल्यास वादीचे फार मोठे आर्थिक नुकसान होणार आहे. सबब निशाणी क्र.५ चे तुर्तातुर्त मनाई अर्जावरील प्रतिवादी यांचे विरुध्दचा तुर्तातुर्त मनाईचा हुकुम पुढील तारखेपर्यंत वाढविण्याची विनंती वादीने केली.

०३. प्रस्तुत अर्जावर आपले म्हणणे दाखल करुन प्रतिवादींनी सदर अर्जास तीव्र आक्षेप नोंदवला. प्रतिवादींच्या कथनानुसार, प्रतिवादी विरुध्द एकतर्फा मनाई आदेश दि.२४/०२/२०२२ रोजी पारीत झाला असुन प्रतिवादींनी दि.२५/०४/२०२२ ला म्हणणे दाखल केले आहे. कायद्यातील स्थापित तत्वाप्रमाणे प्रतिवादी विरुध्द अंतरिम आदेश

झालेस किमान ३० दिवसांचे आत तुर्तातुर्त मनाई अर्जावर आदेश होणे अपेक्षित आहे. तथापी वादी वारंवार मुदतवाढ घेत असल्याने प्रतिवादींचे नुकसान होत आहे. सबब सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती प्रतिवादींनी केली आहे.

०४. प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

०५. वादीच्या कथनानुसार, तुर्तातुर्त मनाई हुकुम पुढील तारखेपर्यंत न वाढविलेस प्रतिवादी हे दांडगाव्याने दावा मिळकतीचा कब्जा काढुन घेतील व दावा मिळकतीमधील ऊस पिकाचे नुकसान करतील व तसे झाल्यास वादीचे फार मोठे आर्थिक नुकसान होणार आहे. त्यामुळे दावा मिळकतीचे स्वरुप अबाधित ठेवणे गरजेचे आहे. प्रतिवादींनी दावा मिळकतीमधील ऊस पिकाचे नुकसान केल्यास वादी यांचे अपरिमित असे नुकसान होण्याची तसेच दाव्यात गुंतागुंत निर्माण होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत न्यायाचे उद्दीष्ट साध्य करण्याकरीता मी खालील आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी यांनी पुढील तारखेपर्यंत दावा मिळकतीबाबत जैसे थे परिस्थिती ठेवावी.

Digitally signed by VASIM BURAN MULLA
Date: 2023.11.10 15:52:34 +0530

दिनांक. १०/११/२०२३.
ठिकाण. गारगोटी.

**( व्ही. बी. मुल्ला )**
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, गारगोटी.